प्रेस नोट दि. 17/03/2020

**रावण टोळीतील कुख्यात गुंड सोन्या जाधव याचा खुन करणाऱ्या आरोपींना देहुरोड पोलीस स्टेशन तपास पथकाने 02 तासांत केले जेरबंद**

तपास पथकाचे सपोनि श्री. पी.जी. गज्जेवार तसेच पोलीस उपनिरीक्षक जगताप, पो.हवा. 119 शिंदे, पो.ना. 646 प्रितम वाघ, पो.ना. 794 पवार, पो.शि. 2505 शेजाळ, पो.शि. 1732 गेंगजे असे पोलीस ठाणे हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना दुपारी 04:00 वा.चे सुमारास निगडी पोलीस ठाणे हद्दीमध्ये **रावण टोळीतील कुख्यात गुंड सोन्या जाधव** याचा कोणीतरी अज्ञात इसमांनी खुन केल्याबाबत माहिती मिळाली. सदर बातमीच्या अनुशंगाने पेट्रोलिंग करीत असताना **पो.ना. 646 प्रितम वाघ** यांना त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, निगडी येथे सोन्या जाधव याचा खुन करणारे संशयित इसम किवळे येथे लपुन बसले आहेत. सदर बातमी आंम्ही मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो. यांना कळविली असता त्यावरुन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. मनिष कल्याणकर यांनी दिलेल्या निर्देशानुसार स.पो.नि. श्री गज्जेवार व तपास पथकातील कर्मचारी स्टाफसह किवळे येथे सिम्बॉसिस कॉलेजचे पाठीमागील बाजुस असलेल्या वडाचे झाडाजवळ गेलो असता तेथे पाच इसम संशयितरित्या बसलेल्या स्थितीत दिसले. आंम्ही त्यांना सोबतचे पोलीस स्टाफचे मदतीने ताब्यात घेवुन त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी निगडी येथे सोन्या जाधव नावाच्या इसमाचा खुन केला असल्याबाबत सांगितले.

सदर इसमांना त्यांची नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव 1) आशिष विशाल जगताप वय 23 वर्ष रा. पंचशिल हौसिंग सोसायटी सेक्टर नं. 27 निगडी प्राधिकरण पुणे. 2) प्रसाद अशोक आल्हाट वय 25 वर्षे रा. पंचशिल हौसिंग सोसायटी सेक्टर नं. 27 निगडी प्राधिकरण पुणे 3) विकास गोरख तांदळे वय 21 वर्षे रा. पंचशिल हौसिंग सोसायटी सेक्टर नं. 27 निगडी प्राधिकरण पुणे 4) सागर रमेश धनवटे वय 18 वर्षे रा. प्राधिकरण पोस्ट ऑफिस, संभाजी चौक निगडी प्राधिकरण पुणे. 5) विधिसंघर्षग्रस्त बालक नामे – प्रबुध्द दिनेश घोडके वय 17 वर्षे रा. पंचशिल हौसिंग सोसायटी सेक्टर नं. 27 निगडी प्राधिकरण पुणे असे असल्याचे सांगितले. सदर आरोपींना पुढिल तपासकामी निगडी पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस आयुक्त सो श्री. संदिप बिष्णोई, मा. अप्पर पोलीस आयुक्त सो श्री रामनाथ पोकळे, मा. पोलीस उप-आयुक्त सो परि.02 श्री विनायक ढाकणे, मा. सहा.पोलीस आयुक्त सो श्री. संजय नाईक-पाटील देहुरोड विभाग, **मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो श्री मनिष कल्याणकर, यांचे मार्गदर्शनाखाली देहुरोड पोलीस स्टेशन तपास पथकाचे ,सपोनि. श्री प्रसाद गज्जेवार, पोलीस उप-निरीक्षक अशोक जगताप, पो.हवा. शिंदे पो.ना. प्रितम वाघ, पोना प्रशांत पवार, पोशि सचिन शेजाळ, पोशि विजय गेंगजे, यांनी केली आहे.**

(मनिष कल्याणकर)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
देहरोड पोलीस स्टेशन पि.चिं.

